# फळशास्त्र विभाग
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
ई- मेल : hdfs@pdkv.ac.in

जा. क्र. वि प्र/ फळ शास्त्र/ संपीसुप्र-१ / 554 / २०२४ दिनांक: २५/०९ /२०२४

## Walk-In Interview

## मुलाखत

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला अंतर्गत फळशास्त्र विभाग, डॉ.पंदेकृवि,अकोला येथे **"संत्रा पिक सुधारणा प्रकल्प"** करिता विविध पदांकरिता कंत्राटी स्वरुपात निश्चित वेतनावर, अहर्ता प्राप्त उमेदवारांना मुलाखतीस बोलविण्यात येत आहे. उमेदवारांनी फळशास्त्र विभाग, डॉ. पंदेकृवि, अकोला येथे **दि. ०७/१०/२०२४** रोजी मुलाखतीस हजार राहावे.

मुलाखतीस नोंदणी दि. ०७/१०/२०२४ सकाळी ९.०० ते ११.०० पर्यंत करावी. त्यानंतर नोंदणी/अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | किमान अहर्ता /पात्रता | दरमहा निश्चित वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | कॉम्पुटर ऑपरेटर | ०१ | अ) कोणत्याही शाखेतील पदवीधर.<br>ब) MSCIT परीक्षा उत्तीर्ण<br>क) टंकलेखन (इंग्रजी ४० आणि मराठी ३० शब्द प्रती मिनिट ) | रु.१०,०००/- |
| २. | कुशल कामगार | ०१ | अ) कृषि विद्यापीठाचा १ वर्षाचा माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम उत्तीर्ण.<br>ब).माळी कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | रु.१०,०००/- |

**वयोमर्यादा:**

उपरोक्त पदासाठी विहित केलेल्या उमेदवारांसाठी वयोमर्यादा ही खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी मुलाखतीच्या दिनांकास ३८ वर्षे आणि मागास वर्गीय प्रवर्गातील (SC,ST,OBC,VJ,NT etc) उमेदवारांकरिता नियमानुसार शिथिलता.

**कामाचे स्वरूप:**

**अ) संगणक चालक :** कार्यालयीन संगणक कामे आणि दैनंदिन कार्यालयीन कामकाजात मदत करणे इत्यादी.

**ब) कुशल कामगार**

१. मातृबागेतील फळझाडांचे संगोपन, फळझाडांची छाटणी, पाणी, खत, कीड व रोग ई.व्यवस्थापन करणे.
२. रोपवाटीकेतील कामे जसे, विविध उगवण माध्यमांचे मिश्रणे तयार करणे,सपाट वाफे, गादी वाफे तयार करणे, बियाणे पेरणी करणे,रोपे लागवड करणे.
३. फळझाडांची अभिवृधीचे विविध प्रकार उदा. शेंडा कलम, पाचर कलम, गुटी कलम करणे, मुख्यत: डोळेकांडी काढणे व डोळे भरणे ई. बाबीमध्ये पारंगत असावे.

**नियम व अटी :**

१. मुलाखतीला येताना उमेदवाराने आपल्या शैक्षणिक अहर्ता, वय, जातीचे प्रमाणपत्र आणि अनुभव प्रमाणपत्र इत्यादी तसेच कार्यरत असल्यास ना हरकत प्रमाणपत्राच्या मुळप्रती व दोन पासपोर्ट फोटो सोबत आणाव्यात. वयाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांना नॉन क्रीमिलेयर/जातीचा दाखला जोडणे आवश्यक आहे.
२. सर्व मूळप्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती स्वयंसाक्षांकित करुन १ प्रत मुलाखतीच्या वेळी सदर करावीत.
३. नावामध्ये बदल असल्यास राजपत्र (गजेट जोडावे).
४. मुलाखतीस उपस्थित उमेदवाराना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता,मुक्कामाची सोय अनुज्ञेय राहणार नाही. जर मुलाखतीकरिता जास्त संख्येत उमेदवार उपस्थित झाल्यास सदर मुलाखत प्रक्रिया दुसऱ्या दिवसी घेण्यात येईल.

५. एका पदाकरिता ३० पेक्षा जास्त उमेदवार हजर झाल्यास चाचणी परीक्षा घेवून गुणांकानुसारउमेदवार व अनुभवा आधारे प्रथम १० उमेदवारांना मुलाखतीकरिता पाचारण करण्यात येईल.
६. मुलाखतीसाठी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
७. उमेदवाराचे काम समाधानकारक न आढळल्यास अथवा गैरवर्तणूक आढळल्यास तात्पुरत्या स्वरूपातील नेमणुकीचा कालावधी संपवण्यापूर्वी कोणतेही कारण न देता प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्याचा अधिकार कार्यालयास राहील.
८. उमेदवाराची नियुक्ती ही प्रकल्पांतर्गत कंत्राटी स्वरुपाची असल्याने उमेदवाराला विद्यापीठातील नियमित आस्थापनेकारिता कुठलाही दावा करता येणार नाही.
९. निवड झालेल्या उमेदवारास १०० रुपयाच्या बॉंड पेपरवर अटी /शर्तीबाबत हमी पत्र सादर करणे अनिवार्य राहील.
१०. काही कारणास्तव निवड प्रक्रिया रद्द करणे किंवा पुढे ढकलणे ह्यांचा पूर्ण अधिकार विभाग प्रमुख, फळशास्त्र विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा राहील.
११. कार्यालयीन कामकाजाची वेळ विद्यापीठ नियमानुसार राहील. सुटीच्या दिवशी कामाच्या निकडीनुसार उपस्थित राहावे लागेल.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ.पं. दे. कृ. वि., अकोला